# प्रेसनोट

दि. २७/०१/२०२३

सजा - उरवडे, ता. मुळशी, जि. पुणे येथील तलाठी व कोतवाल यांचेवर
लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | पौड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ४७/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, १२. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ६७ वर्षे |
| आरोपी लोकसेवकांचे नाव व कार्यालय | १) संजय बाबुराव दाते, तलाठी, उरवडे, ता. मुळशी, जि. पुणे.<br>२) अमित भंडलकर, कोतवाल, उरवडे, ता. मुळशी, जि. पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | प्रथम २,००० रू. व तडजोडी अंती ९४२/- (नऊशे बेचाळीस रूपये) |

पडताळणी दिनांक :- ३०/१२/२०२२, दि. ०२/०१/२०२३
गुन्हा दाखल दिनांक :- २७/०१/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे माहिती अधिकारातील कागदपत्र विनाशुल्क देण्याबाबत राज्य माहिती आयोगाचा आदेश असताना, लोकसेवक संजय दाते, तलाठी - उरवडे, ता. मुळशी, जि. पुणे यांनी सदरची माहिती देणेकरीता २,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचेकडे लोकसेवक क्र. १ दाते यांनी माहिती अधिकारातील कागदपत्रांच्या प्रती देण्यासाठी ९४२/- रुपये लाचेची मागणी केली. त्या लाच मागणीस कोतवाल भंडलकर यांनी सहाय्य केले म्हणून दोघांवर वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला असून, त्यामध्ये क्रमांक १ तलाठी दाते यांना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक क्रांती पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.

Scanned with CamScanner